महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ३५७८ /५०                                                                    दिनांक :- १३ सप्टेंबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा मुंबई मंडळ सोडतीसाठी १९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत

१९ सप्टेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अनामत रकमेचा भरणा करता येणार

मुंबई, दि. १३ सप्टेंबर, २०२४ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक असलेल्या मुंबई मंडळातर्फे मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांमधील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित संगणकीय सोडतीकरिता दि. १९ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत असून दि. १९ सप्टेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येणार आहे.

सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेला दि. ०९ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी १२ वाजेपासून प्रारंभ झाला. सोडतीला अर्जदारांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून सोडतीसाठी आज दि. १३ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत ७५,५७१ अर्ज प्राप्त झाले असून सुमारे ५५,००० अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झाले आहेत.

दि. ०८ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबईतील नरीमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे संगणकीय सोडत काढली जाणार आहे.

दि. १९ सप्टेंबर, २०२४ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेत आरटीजीएस/एनइएफटीद्वारे अनामत रकमेचा भरणा करण्याची मुदत आहे. दि. २७ सप्टेंबर, २०२४ रोजी सोडतीसाठी प्राप्त अर्जाची प्रारूप यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर सायंकाळी ०६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे. दि. २९ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२. ०० वाजेपर्यंत प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून ऑनलाइन दावे हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत आहे. दि. ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर सायंकाळी ०६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे. सोडत झाल्यानंतर सोडतीमधील यशस्वी व प्रतीक्षा यादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

मुंबई मंडळाच्या सन २०२४ च्या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटासाठी (Economically Weaker Section) ३५९ सदनिका, अल्प उत्पन्न गटासाठी (Lower Income Group) ६२७ सदनिका, मध्यम उत्पन्न गटासाठी (Middle Income Group) ७६८ सदनिका, उच्च उत्पन्न गटासाठी (Higher Income Group) २७६ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या सोडतीत म्हाडाच्या मुंबई मंडळाने बांधलेल्या १३२७ सदनिका, विकास नियंत्रण नियमावली ३३ (५), ३३ (७) व ५८ अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पातून विकासकांकडून गृहसाठा (Housing Stock) म्हणून म्हाडाला प्राप्त ३७० सदनिका (नवीन व मागील सोडतीतील सदनिका) व मागील सोडतीतील विविध वसाहतीतील विखुरलेल्या ३३३ सदनिकांचा समावेश आहे.

सदनिकांच्या वितरणासाठी म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये तसे केल्यास मुंबई मंडळ कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही, असे आवाहन म्हाडातर्फे करण्यात येत आहे.
###

मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

--

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com
==========================================================================

Outward No. 3578/50 Dt.13th September, 2024

Press Release

## MHADA Mumbai Board Lottery 2024: Last Date for Application Submission Set for September 19

Over 75,000 applications already received for 2,030 homes across various housing projects

Mumbai, September 13, 2024: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has announced that the final date for submitting applications for the Mumbai Board's computerised lottery of 2,030 homes is September 19, 2024, by 12:00 PM. Applicants can make the required online payment for the earnest money deposit until 11:59 PM on the same day.

The application and online registration process began on August 9,2024, and has since received an overwhelming response. As of 7:00 PM on September 13, MHADA has received 75,571 applications, with around 55,000 applications submitted along with the earnest money deposit.

The computerised lottery draw is scheduled for October 8, 2024, at 11:00 AM, at Yashwantrao Chavan Centre, Nariman Point, Mumbai.

For applicants using RTGS/NEFT to pay the earnest money, the deadline is September 19, within the operational hours of their respective banks. Additionally, the provisional list of applications will be published on MHADA's official website https://housing.mhada.gov.in on September 27, 2024, at 6:00 PM. Any objections or claims can be submitted online until 12:00 PM on September 29, 2024. The final list

of accepted applications will be posted on the same website at 6:00 PM on October 3, 2024.

For this year's lottery, 359 units are reserved for the Economically Weaker Section (EWS), 627 units for the Lower Income Group (LIG), 768 units for the Middle Income Group (MIG), and 276 units for the Higher Income Group (HIG). MHADA's Mumbai Board is offering a mix of 1,327 units constructed by MHADA and 370 units obtained from developers under redevelopment projects governed by DCR 33(5), 33(7), and 58. Additionally, 333 units from previous lotteries are also included.

MHADA has emphasized that it has not appointed any representatives, consultants, or property agents for the sale of these homes. Applicants are urged not to engage with any unauthorized individuals claiming to represent MHADA, as the authority will not be responsible for any fraudulent transactions.

###

Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial